Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# शिरपूर तालुक्यातील माध्यमिक व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचा परीक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताण-तणावांचा अभ्यास

**श्री. छोटू देवराम पाटील**
**मुख्याध्यापक**
**आर. सी. पटेल प्राथमिक शाळा**
**शिरपूर**

**सारांश:**
आई-वडीलांच्या अपेक्षा शिक्षकांचा व्यवसाय दृष्टीकोन व वाढत्या अभ्यासाचा बोझा, परिक्षेचा ताण ह्यातून विद्यार्थ्यांवर एक प्रकारे ओझे झालेले असते व ह्यातून जर व्यवस्थित उत्तीर्ण झाले नाही तर तो विद्यार्थी शेवटी आत्महत्या करीत असतो. विद्यार्थ्याला ताण-तणावाचे व्यवस्थापन जर व्यवस्थित झाले तर त्याचा योग्य व्यक्तिमत्व विकास घडून येईल व तो देशाचा एक जबाबदार नागरिक घडेल व देशाचा विकास होईल व शिक्षण क्षेत्राचाही विकास घडण्यास मदत होईल म्हणून तालुक्यातील माध्यमिक व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचा ताण-तणावाचा चिकित्सक अभ्यास हा विषय निश्चित केला होता. आज दैनंदिन जीवनात तणावाला सर्वांना सामोरे जावे लागते प्रत्येकास ताण तणाव हा जाणवत असतो. त्यात विद्यार्थ्यांनाही परीक्षेमुळे तणाव निर्माण होतो. त्यामुळे समाजातील या ज्वलंत समस्येवर थोड्या फार प्रमाणात संशोधनाच्या माध्यमातून प्रकाश टाकता येईल व तणाव कमी करण्याकरता काही उपक्रमांची/उपाययोजना करता येईल. यासाठी प्रस्तुत समस्येवर संशोधन केले आहे.

**प्रास्ताविक:**

एकविसाव्या शतकात पर्दापण करुनही आधुनिक सुखसोयी करीता मानव धडपड करीत आहे. प्रत्येक व्यक्ती आपले जीवन विलासी सुखी, आनंदी, जगता यावे म्हणून धावपळ करीत असतांना आपल्याला आढळतो. मानव हा नवनवीन शोध लावीत आहे. नव-नवी उत्क्रांती करीत आहे. अशातच व्यक्ती-व्यक्तीतील संबंध दुरावत आहेत. त्यामागील कारणे म्हणजे व्यक्तीवरील वाढणारा ताण. ताण व ह्या ताणामुळे मानवाचे मानसिक आरोग्यही बिघडत चालले आहे. मानव हा विकसित प्राणी मानला जातो. कारण त्याने विविध क्षेत्रे निर्माण केले आहेत. त्यापैकी एक क्षेत्र म्हणजे शिक्षण क्षेत्र होय. ह्या क्षेत्रातही शांत बसून न राहता मानवाने त्यातही भरपूर प्रगती केलेली दिसून येते. ह्या धावपळीत मोठे व्यक्ती तर आहेच पण विद्यार्थीही कसे सुटणार. आजच्या विद्यार्थ्यांला ह्या धावपळीच्या जीवनातून मुक्तता नाही कारण विद्या घेणे सोपे राहीले नाही. प्राथमिक स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व विद्यार्थ्यांना शाळेचा अभ्यास व परीक्षेचा ताण हा होतोच. आजचे युग हे आधुनिक व तंत्रज्ञानाचे युग असल्याने स्पर्धेचे आहे. त्यात प्रत्येकाला आपल्या अस्तित्वासाठी लढा द्यावा लागतो. वार्षिक परिक्षा त्यात मिळणारे कमी गुण किंवा जीवनातील व्यवसाय निवड करीत असतांना होणारी दिशाभूल व आवश्यक असणारे जीवन उपयोगी शिक्षण न मिळणे ह्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर मोठ्या प्रमाणावर ताण-तणाव निर्माण होत असतो. आजच्या कामाचा वाढलेला बोझा, वेग ह्या पैकी कोणत्या न कोणत्या कारणाने माणसाचे मन सतत व्यस्त व व्यथीत आहे. म्हणून आपण बघतो की, समाजातील प्रत्येक तरुण, लहान मूले ह्यांना ताण-तणाव जाणवत असतो. जागतीक आरोग्य संशोधनानुसार आपल्याला होणाऱ्या सर्व आजारांचे कारण ८०% ताण-तणाव होय. मानवाने जरी २१ व्या शतकात पदार्पण केले असले तरी त्याच बरोबर धावपळ, चिंता, ताण वाढतच आहे. कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी मानव हा प्रयत्न करीत असतो. पण त्या प्रयत्नांन यश आले नाही तर आशेचे रुपांतर

निराशेत होते व ताण-तणाव वाढतो, मनावर एक दडपण येते व मानसाचे मानसिक आरोग्य बिघडते. आपल्या ताण-तणावाची कारणे सोपी असतात पण शोधण्यासाठी त्याकडे वेगळ्या पद्धतीने पाहिल्यास त्याचा शोध लागू शकतो व ताण-तणावावर नियंत्रण ठेवता येते. आजच्या परिस्थितीचा विचार केला तर विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा बोझा हा वाढतच चालला आहे. मग त्यात आजची शिक्षण पद्धती चांगली की वाईट ह्याचा प्रश्न निर्माण होतो. आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक विद्यार्थ्याला असे वाटते की, आपण ही ह्या स्पर्धेमध्ये टिकून राहिले पाहिजे आणि यशस्वी झाले पाहिजे व ह्या गोष्टीचा त्याच्या मनावर नेहमी ताण निर्माण होत असतो. आजच्या युगात प्राथमिक शाळा असो की माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा असो विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा, परीक्षेचा खूप ताण वाढलेला आहे व त्यांच्यावर लादलेल्या अपेक्षाही खूप मोठ्या असतात व त्यांना पूर्ण करण्यासाठी तो ताणतणावासारख्या अवस्थेतून जात असतात.

**संशोधनाची गरज:**

विद्यार्थ्यांमध्ये विकृती न व्हावी म्हणून प्रस्तुत संशोधकाला ह्या संशोधनाची गरज वाटते. त्यामध्ये व्यक्तीमत्व विकास घडविण्यासाठी आवश्यक गरज वाटते. ताणतणावामध्ये कोणतीही व्यक्ती आपले काम कौशल्यपूर्ण करू शकत नाही. उलट व्यक्ती तणावामध्ये कार्य करत राहिल्यास त्याच्यातच विकृती निर्माण होण्याची दाट शक्यता असते व अशातच व्यक्तिचे भविष्य उज्वल न होता अंध:कारमय होऊ शकते. त्यासाठी व्यक्तिमधील ताणावाचे व्यवस्थापन करुन त्यावरील ताण कमी करणे ही गरज निर्माण झालेली होती. २. कौशल्यपूर्ण शिक्षण ही काळाची गरज असल्यामुळे आजच्या शिक्षण पद्धतीत खूप मोठ्याप्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कौशल्य किंवा कला गुणांना पाहिजे तसा वाव मिळत नाही. त्यामध्ये बहुतेक शिक्षण शिक्षणसंस्थेत दिले जाते पण विद्यार्थी मोठा ताण निर्माण करुन आपल्या कलागुणांना वाव देत नाही. त्याचेही कलागुण विकसीत झाले तर तो एक भविष्यातील चांगला नागरीक बनेल. म्हणून प्रस्तुत संशोधन करणे गरजचे वाटले होते.३. शिक्षणातील अडथळा दूर व्हावा, शिक्षणामध्ये एक ना अनेक अडथळे आहेत त्यातला एक ताण-तणावांची सर्व सामान्य मुलेच नाही तर प्रतिभाशाली बालके देखील शैक्षणिक जीवन पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे हा अडथळा दूर करण्याचे गरजेचे असल्यामुळे समस्येची निवड करणे आवश्यक वाटत होते.४. विद्यार्थ्यांमध्ये जो ताण-तणाव निर्माण होतो. तो शिक्षण प्रक्रियेमुळेच म्हणजे विद्यार्थ्यांना प्रवेश. आवडीचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणारे परिक्षेतील गुण एक ना एक अनेक गोष्टीविषयी ताण निर्माण होण्यास शिक्षण प्रक्रिया कारणीभूत ठरते व ही प्रक्रिया सोपी व्हावी हे सुद्धा गरजेचे असल्याकारणाने ह्या विषयाची निवड करणे आवश्यक वाटले होते.

**संशोधनाचे महत्त्व :**

ताण तणावासंबंधी विचार केला असता तो फक्त मोठ्या लोकांना नसतो तर तो लहानांपासून तर अबाल वृद्धांपर्यंत हा ताण-तणाव जाणवत असतो. त्यामुळे ही अतिशय विचार करण्याची गोष्ट आहेच पण त्याच्यावर अधिक उपाययोजना करण्याची गरज आहे. जेणेकरुन व्यक्तीने आपले कार्य करावे पण सोबत जीवनाचा पूर्ण आनंद उपभोगता अशी संशोधिकेची अपेक्षा आहे. म्हणून संशोधिकेस ही समस्या निवडणे महत्वाचे होते. ताण-तणावात मानव जातीचा पूर्ण समावेश म्हटल्यानंतर त्यामध्ये सगळेच आलेच स्त्री-पुरुष, लहान-मोठे या सर्वांचा समावेश आला. ताण-तणाव हा कशामुळे हे स्पष्ट किंवा निश्चित सांगणे कठीण आहे. पण ढोबळ मनाने विचार केल्यास व्यक्तीच्या कामाचे स्वरुप त्यांची क्षमता लक्षात घेतल्यावर कळते की, त्या दोघांमध्ये असमतोल आढळून आल्या कारणाने म्हणता येईल. पण आपण शैक्षणिक दृष्ट्या विचार केला असता त्यामध्ये विद्यार्थी ही ताण-तणावात सापडत असतो. विद्यार्थी कोणताही असू शकतो. समस्या निवडतांना संशोधिकेस माध्यमिक स्तरावरचा विद्यार्थी महत्वाचा होता. आजच्या वस्तूस्थितीचा विचार केल्यास माध्यमिक स्तरावरच्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या ह्या दिवसेंदिवस वाढतांना दिसुन येत आहे. त्याची कारणमिमांसा केली असता त्याला शिक्षणाचा वाढता व्याप हा महत्वाचा आहे आणि त्याला जोड देणारी कुठे

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

ना आजची शिक्षण पद्धतीमुळे ताण-तणावाचे प्रमाण वाढतांना दिसून येते.वर्तमान पत्रात छापून येणारे ताणविषयीचा लेख व त्यावर उपाय योजना इ. विचार केला असता ताण-तणाव हा विद्यार्थ्यांची मानसिकतेचे खच्चीकरण करते आणि त्यातच विद्यार्थी हा शेवटी आत्महत्येकडे प्रवृत्त होतांना दिसतो. आजच्या शिक्षण पद्धतीत दोष कुठे ना कुठे उमटून दिसतो. ही शिक्षण पद्धती फक्त महाराष्ट्र राज्याची नव्हे तर पूर्ण भारतातील इतर राज्याचीही स्थिती आहे. म्हणून त्यामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने का असेना संशोधिकेला ही समस्या महत्वाची वाटली.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) शिरपुर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचा परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाचा अभ्यास करणे.

२) शिरपुर तालुक्यातील आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचा परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाचा अभ्यास करणे.

३) शिरपुर तालुक्यातील माध्यमिक व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाचा तूलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना :**

१) शिरपुर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींचा परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाच्या मध्यमान गुणं◌ाकात सार्थक फरक आढळून येत नाही.

२) शिरपुर तालुक्यातील आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींचा परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाच्या मध्यमान गुणं◌ाकात सार्थक फरक आढळून येत नाही.

३) शिरपुर तालुक्यातील आश्रम शाळा व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाच्या मध्यमान गुणंकात सार्थक फरक आढळून येत नाही.

४) शिरपुर तालुक्यातील आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींचा परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाच्या मध्यमान गुणंकात सार्थक फरक आढळून येत नाही.

५) शिरपुर तालुक्यातील आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींचा परिक्षेच्या भितीने निर्माण होणाऱ्या ताणतणावाच्या मध्यमान गुणंकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन हे सद्यस्थितीवर आधारीत असल्यामुळे वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. **न्यादर्श** :जनसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गटाला न्यादर्श म्हणतात.

**तक्ता क्रं. १**

| अ.क्रं. | विद्यार्थी गट | वर्ग | विभाग | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | आश्रमशाळा | माध्यमिक शाळा | |
| १ | विद्यार्थी | ९ वी | ४० | ४० | ८० |
| २ | विद्यार्थीनी | ९ वी | ४० | ४० | ८० |
| | | एकुण | ८० | ८० | १६० |

**संशोधनाची साधने :-**

सदर संशोधनात डॉ. मधु अग्रवाल व श्रीमती उषा कौशल यांची प्रमाणित परीक्षेतीत ताण तणाव या चाचणीचा वापर केला

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

**माहितीचे विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनात शिरपुर तालुक्यातील माध्यमिक व आश्रमशाळेतील इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांची डॉ. मधु अग्रवाल व श्रीमती उषा कौशल यांची प्रमाणित परीक्षेतीत ताण तणाव या चाचणीचा वापर केला व उद्दिष्टानूसार संशोधनात मांडण्यात आलेल्या परिकल्पना तपासून पाहिल्यात.

**परिकल्पना क्रं. ०१**

**शिरपुर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रं. ४**

**माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचे परीक्षेतील ताण-तणावा चे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व t मूल्य.**

| माध्यमिक शाळा | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना t | प्राप्त t | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | ४० | १२.२५ | ५.७० | १.९९ | ३.०३ | **त्याग** |
| विद्यार्थीनी | ४० | १६.४७ | ६.७१ | | | |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९९ आहे व प्राप्त t मूल्य ३.०३ असून ते नमुना t मूल्यापेक्षा जास्त आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

- यावरून असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या परीक्षेतील ताण तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येतो. दोन्ही गटांच्या मध्यमानातील सार्थ फरक आहे. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींचे परीक्षेतील ताण- तणावाचे मध्यमान (१६.४७) हे विद्यार्थ्यांच्या मध्यमानापेक्षा (१२.२५) जास्त आहे.
- यावरून असे म्हणता येईल, माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींना परीक्षेतील ताण तणाव हा विद्यार्थ्यांपेक्षा जास्त आहे.

**परिकल्पना क्रं. ०२**

**शिरपुर तालुक्यातील आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रं. ५**

**आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचे परीक्षेतील ताण तणावाचे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व t मूल्य.**

| आश्रम शाळा | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना t | प्राप्त t | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | ४० | १५.४२ | ५.९८ | १.९९ | ०.२९ | **स्वीकार** |
| विद्यार्थीनी | ४० | १५ | ६.७१ | | | |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९९ आहे व प्राप्त t मूल्य ०.२९ असून ते नमुना t पेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

- यावरून असे दिसून येते की , आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येत नाही. दोन्ही गटांच्या मध्यमानातील सार्थ फरक नाही. दिसून येणारा फरक हा केवळ योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल.
- यावरून असे म्हणता येईल, आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींची परीक्षेतील ताण तणाव हा समान आहे.

**परिकल्पना क्रं. ०३**

**शिरपुर तालुक्यातील आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रं. ६**

**आश्रम व माध्यमिकशाळेतील विद्यार्थ्यांचे परीक्षेतील ताण-तणावाचे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व t मूल्य.**

| विद्यार्थी | संख्या | मध्यमान (M) | प्रमाणविचलन (SD) | नमुना t | प्राप्त t | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| आश्रम शाळा | ४० | १२.२५ | ५.७० | १.९९ | २.४३ | त्याग |
| माध्यमिकशाळा | ४० | १५.४२ | ५.९८ | | | |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९९ आहे व प्राप्त t मूल्य २.४३ असून ते नमुना t पेक्षा अधिक आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

- यावरून असे दिसून येते की , माध्यमिक व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येतो. दोन्ही गटांच्या मध्यमानात सार्थ फरक आहे. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे परीक्षेतील ताण-तणावाचे मध्यमान(१५.४२) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमानापेक्षा (१२.२५) अधिक आहे.
- यावरून असे म्हणता येईल, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांन आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांपेक्षा परीक्षेतील ताण-तणाव अधिक आहे.

**परिकल्पना क्रं. ०४**

**शिरपुर तालुक्यातील आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीचे परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रं. ७**

**आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींचे परीक्षेतील ताण-तणावाचे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व t मूल्य.**

| विद्यार्थीनी | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना t | प्राप्त t | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| आश्रमशाळा | ४० | १६.४७ | ६.७७ | १.९९ | ०.९४ | स्वीकार |
| माध्यमिक शाळा | ४० | १५ | ६.७१ | | | |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९९ आहे व प्राप्त t मूल्य ०.९४ असून ते नमुना t पेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

- यावरून असे दिसून येते की , आश्रम व माध्यमिक विद्यार्थीनीचे परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येत नाही. दोन्ही गटांच्या मध्यमानातील सार्थ फरक नाही. दिसून येणारा फरक हा केवळ योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल.
- यावरून असे म्हणता येईल, आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींचे परीक्षेतील ताण-तणाव हा समान आहे.

**परिकल्पना क्रं. ०५**

**शिरपुर तालुक्यातील आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रं. ८**

**आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे परीक्षेतील ताण-तणावाचे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व t मूल्य.**

| माध्यमिक शाळा | संख्या | मध्यमान (M) | प्रमाणविचलन (SD) | नमुना t | प्राप्त t | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| आश्रम शाळा | ८० | १४.३६ | ६.५७ | १.९७ | ०.८२ | स्वीकार |
| माध्यमिक शाळा | ८० | १५.२१ | ६.३१ | | | |

df = १५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९७ आहे व प्राप्त t मूल्य ०.८२ असून ते नमुना t पेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

- यावरून असे दिसून येते की , आश्रम व माध्यमिकशाळेतील विद्यार्थ्यांचे परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येत नाही. दोन्ही गटांच्या मध्यमानातील सार्थ फरक नाही. दिसून येणारा फरक हा केवळ योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल.
- यावरून असे म्हणता येईल, आश्रम व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा परीक्षेतील ताण-तणाव हा समान आहे.

## निष्कर्ष व अन्वयार्थ

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने ५ शुन्यपरिकल्पना मांडल्या होत्या. त्याचे परिक्षण हे संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग करून करण्यात आले व त्यांच्या अन्वयार्थ पुढीलप्रमाणे मांडला आहे.

१. माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या परीक्षेतील ताण तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येतो.
२. आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येत नाही.
३. माध्यमिक व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येतो.
४. आश्रम व माध्यमिक विद्यार्थीनीचे परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येत नाही.
५. आश्रम व माध्यमिकशाळेतील विद्यार्थ्यांचे परीक्षेतील ताण-तणावाच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक दिसून येत नाही.

**संदर्भ सुची :**

१) आगलावे, प्रदिप. (२०००). संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे (प्रथम आवृत्ती). नागपूर: विद्या प्रकाशन.

२) कदम, चा.प. (१९९९). *शैक्षणिक संख्याशास्त्र* (द्वितीय आवृत्ती). पुणे: नूतन प्रकाशन.

३) घोरमोडे, के. यु. व घोरमोडे कला. (२००८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे. (प्रथम आवृत्ती). नागपूर: विद्या प्रकाशन.

४) पंडीत, ब. बि. (२००५). *शिक्षणातील संशोधन (प्रथम)* पुणे. :नित्यनूतन प्रकाशन

५) पंडित, ब. बी. व मोरे, लता. (२०१०). *शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग* (प्रथम आवृत्ती). नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.

६) पंडीत ब.वि. (१९८९): *शिक्षणातील संशोधन,* नित्यनुतन प्रकाशन, पुणे,

७) भिंताडे वि.रा. (२००८) : *शैक्षणिक संशोधन*, नित्यनुतन प्रकाशन. पुणे,

८) Best T.W. (२००४). Research in Education (७th Edition) : Prentice Hall of India, New Delhi. Pvt. Ltd.